जा.क्र./2015/प्रशासन/जाहिरात/ प्रसिध्दी/कावि/182
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
दिनांक22/12/2016

# जाहिरात

## (कलम4(नियम 3))

भूमि संपादन , पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 च्या कलम 4 अंतर्गत व नियम 2014 च्या नियम 3 नुसार नंदुरबार जिल्हयातील विविध प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन करण्यापूर्वी प्रकल्पबाधित क्षेत्रातील बाधित होणा-या कुटुंबांचे सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना तयार करणेसाठी विदयापीठ/ शासकीय महाविदयालय / सामाजिक कार्यविभाग / समाजशास्त्र शाखा/ अर्थशास्त्र शाखा/ यापैकी कोणत्याही प्रशिक्षण विदयाशाखा किंवा यासारख्या शासकीय संस्था किंवा अशासकीय संघटना / व्यावसायिक संस्था (किंवा अशासकीय संघटना व व्यावसायिक संस्था) यांच्या कडून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवाल व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना तयार करण्यात येणार आहे.यासाठी खालील पात्रता पूर्ण करणा-या विदयापीठ / शासकीय महाविदयालय / शासकीय महाविदयालय / सामाजिक कार्यविभाग / समाजशास्त्र शाखा/ अर्थशास्त्र

शाखा व अशासकीय संघटना व व्यावसायिक संस्था यांचे कडून जाहिरातीव्दारे अर्ज मागविणेत येत आहेत. खालील पात्रता पूर्ण करणा-यांनी दिनांक 31 /12/2016 रोजी सायंकाळी 5.45 पावेतो भूसंपादन शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे अर्ज दाखल करावेत.

पात्रता:-

1. संबंधीत विदयापीठ/ महाविदयालय/ विदयाशाखा यास शासन मान्यता असावी.
2. संबंधीत अशासकीय संघटना / व्यावसायिक संस्था/शासकीय संस्था हया नोंदणीकृत असाव्यात
3.शासकीय मान्यता किंवा नोंदणी ही या जाहिरातीपूर्वी 3 वर्षे पूर्ण झालेली असावी.
4.सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना यांच्या कामाचा कमीत कमी 3 वर्ष अनुभव असावा.
5.संबंधीत संस्थेचे शासनमान्य लेखा परिक्षणाकडून 3 वर्षाचे लेखापरिक्षण केलेले असावे
6. या कामासाठी योग्य ते प्रशिक्षीत मनुष्यबळ ,इमारत, फर्निचर, कार्यालय, वाहन व्यवस्था इ. संस्थेच्या मालकीचे असावे व ते अदयावत असावे.
7. अर्जाचा नमूना हा एनआयसी नंदुरबार या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी नंदुरबार

# अर्जाचा नमूना

1.विदयापीठ/ महाविदयालय/ विदयाशाखा
अशासकीय संघटना / व्यावसायिक संस्था/
शासकीय संस्था यांचे नाव:-

2.संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक
(शासकीय मान्यता किंवा नोंदणी ही या जाहिरातीपूवी 3 वर्ष पूर्ण झालेली असावी.)

3.सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना यांच्या कामाचा अनुभव
(कमीत कमी 3 वर्ष अनुभव आवश्यक)

4.शासनमान्य लेखा परिक्षणाकडून 3 वर्षाचे लेखापरिक्षण केलेले आहे किंवा कसे

5.कामासाठी योग्य ते प्रशिक्षीत मनुष्यबळ ,इमारत, फर्निचर, कार्यालय, वाहन व्यवस्था इ. संस्थेच्या मालकीचे व ते अदयावत आहे काय?

संस्था चालक यांची स्वाक्षरी
(शिक्क्यासह)

वरील 1 ते 5 मध्ये देणेत आलेल्या माहितीबाबतचे पुरावे अर्जासोबत सादर करावेत.